अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहामध्ये सादर करीत आहे.

१. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी कर संकलनाचे सुधारित अंदाज रुपये दोन लक्ष पंच्याहत्तर हजार चारशे अठ्ठ्यान्नव कोटी आहे. यापैकी वस्तू व सेवा कर (जीएसटी), मूल्यवर्धित कर (व्हॅट), केंद्रीय विक्रीकर (सीएसटी), व्यवसाय कर इत्यादी मुख्य करांसाठी कर संकलनाचे सुधारित अंदाज रुपये एक लक्ष पंचावन्न हजार तीनशे सात कोटी आहे.

२. “कोविड-१९” या जागतिक महामारीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकासाची मंदावलेली गती हळुहळू पूर्वपदावर येत आहे. तथापि, सध्या सुरु असलेल्या रशिया-युक्रेन युद्धाचा आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे, त्याचा प्रभाव महाराष्ट्रातील शेती, उद्योग व सेवा क्षेत्रावर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ठरविण्यात आलेले उद्दिष्ट साध्य करणे कठीण असले तरी ठरविलेले उद्दिष्ट साध्य करण्याचा शासन सर्वोतोपरी प्रयत्न करेल.

३. या पार्श्वभूमीवर उद्योग व व्यापार क्षेत्राला चालना देण्यासाठी तसेच राज्यातील सामान्य नागरिक यांना दिलासा देण्यासाठी मी सभागृहासमोर खालील उपाययोजना मांडत आहे.

**कर सवलतीचे प्रस्ताव :—**

**राज्यकर विभागाची अभय योजना**

४. राज्यकर विभागाची अभय योजना मी जाहीर करीत आहे. सदर अभय योजनेचे नाव “महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड योजना-२०२२” असे असेल.

ही योजना वस्तू व सेवा कर लागू होण्यापूर्वी विक्रीकर विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध करांवरील सवलती संदर्भात असून, योजनेचा कालावधी दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ असा असेल.

राज्यकर विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध कर कायद्यांतर्गत एका वर्षात वैधानिक आदेशान्वये रुपये १०,००० पर्यंत थकबाकीची रक्कम असल्यास, सदर थकबाकीची रक्कम मी पूर्णपणे माफ करण्याचे प्रस्तावित करत आहे. याचा लाभ जवळपास १ लक्ष प्रकरणांत लहान व्यापाऱ्यांना होईल.

ज्या व्यापाऱ्यांची वैधानिक आदेशान्वये थकबाकीची रक्कम दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी रुपये १० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या व्यापाऱ्यांना अविवादीत कर, विवादीत कर, शास्ती यांचा वेगवेगळा हिशोब न करता एकूण थकबाकीच्या सरसकट २० टक्के रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध असेल. अशी ठोक २० टक्के रक्कम भरल्यास उर्वरित ८० टक्के रकमेस माफी देण्यात येईल. याचा लाभ जवळपास २ लक्ष २० हजार प्रकरणांत मध्यम व्यापाऱ्यांना होईल.

**नैसर्गिक वायुवरील मूल्यवर्धित करात सवलत**

५. पर्यावरणास पुरक असणाऱ्या नैसर्गिक वायुचा घरगुती पाईप गॅस, सीएनजीवर चालणारी मोटार वाहने, ऑटो रिक्षा, टॅक्सी व खाजगी वाहने यांमध्ये मोठ्या प्रमाणात वापर होतो. पर्यावरण पूरक असणाऱ्या नैसर्गिक वायुच्या वापरास प्रोत्साहन देण्याकरिता व सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी नैसर्गिक वायुवरील मूल्यवर्धित कराचा दर हा १३.५ टक्के वरुन कमी करुन ३ टक्के इतका करण्याचे प्रस्तावित करीत आहे. यामुळे राज्यास अंदाजे रुपये ८०० कोटीची महसुली घट होईल.

**मुद्रांक शुल्क समायोजनेसाठी लागणाऱ्या कालावधीत वाढ**

६. बांधकाम व्यवसायाला चालना देण्यासाठी व या व्यवसायात गुंतवणूकदारांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमाच्या अनुच्छेद ५ (g-a) (ii) च्या परंतुकानुसार पूर्वीच्या दस्तातील भरलेला मुद्रांक शुल्क नंतरच्या दस्तातील मुद्रांक शुल्काशी समायोजित करण्यासाठी विहित केलेला कालावधी १ वर्षाऐवजी ३ वर्षे करणे प्रस्तावित करीत आहे.

**महामंडळे, संस्था यांना जनहितार्थ विना मोबदला बक्षीसपत्राद्वारे देण्यात येणाऱ्या मिळकतींवरील मुद्रांक शुल्क माफी बाबत**

७. महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था यांना विनामोबदला स्थावर मिळकत हस्तांतरीत होत असेल, तर अशा दस्तांवर सध्या आकारला जाणारा बक्षीस पत्रांवरील ३ टक्के, खरेदीपत्रावरील ५ टक्के ह्या मुद्रांक शुल्कात महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, कलम ९ अन्वये माफी प्रस्तावित करीत आहे. यामुळे राज्यास अंदाजे रुपये २१ कोटीच्या महसुली तुटीची शक्यता आहे.

**मुद्रांक शुल्कावरील अभय योजना, २०२२**

८. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकरणांमध्ये असलेल्या मुद्रांक शुल्कावरील दंडाच्या रकमेत नागरिकांना सवलत देण्याकरिता दिनांक १ एप्रिल, २०२२ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीसाठी दंडसवलत अभय योजना राबविण्यात येईल. यामुळे माफ केलेल्या दंडाच्या प्रमाणात, अंदाजे रुपये १,५०० कोटी इतक्या दंड महसुलीच्या तुटीची शक्यता आहे.

**सोने व चांदीच्या आयातीवरील मुद्रांक शुल्क माफ करणे**

९. सोने चांदीचे दागिने बनविणारे छोटे-मोठे उद्योग, रिफायनरी व निर्यातीस चालना देण्यासाठी तसेच राज्यात रोजगार निर्मिती होऊन कर चुकवेगिरीला आळा बसण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये आयात होणाऱ्या सोने-चांदीच्या डिलिव्हरी ऑर्डरच्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार सध्या आकारण्यात येणारे ०.१ टक्के मुद्रांक शुल्क माफ करण्याचे प्रस्तावित करत आहे. यामुळे राज्यास अंदाजे रुपये १०० कोटीच्या महसुली तुटीची शक्यता आहे.

**राज्याच्या जलवाहतुकीस चालना देण्यासाठी करमाफी**

१०. राज्यात जलवाहतुकीस चालना देण्यासाठी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अखत्यारितील दिनांक १ जानेवारी, २०२२ पासून नव्याने सुरु झालेल्या जलमार्गावरील चालणाऱ्या फेरीबोट, रो-रो बोटी यांमधून प्रवास करणारे प्रवासी, पाळीव प्राणी, वाहने, माल इत्यादींवर महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून आकारण्यात येणाऱ्या करास पुढील ३ वर्षांसाठी सुट देण्यात येत आहे.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**